ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3484. Licence No. 53.

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १२ ऑक्टोबर, १९५५ | अंक ४१

## विविध माहिती

**बारडोली येथील साखरेचा कारखाना**—बारडोली येथें काढण्यांत यावयाच्या सहकारी साखर कारखान्यांत येत्या डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होईल. कारखान्यासाठीं लागणारी यंत्रसामुग्री एका जर्मन कंपनीकडून घेण्यांत येणार असून तीस ४५ लाख रुपये लागतील. मशिनरी हातीं येऊन कारखान्याच्या उभारणीस लवकरच प्रारंभ होईल.

**नीरापानाचा उपयोग**—डहाणूनजीक खासा येथें चालविण्यांत आलेल्या सर्वोदय केंद्राच्या चालकांनीं असें मत व्यक्त केलें आहे, कीं मुलांना रोज दोन ग्लास नीरा प्यावयास दिली तर त्यांचें वजन वाढण्यास तिचा चांगला उपयोग होतो. प्राथमिक शाळांतील १५० मुलांवर नीरापानाच्या नियमित सेवनाचा प्रयोग करण्यांत आला असतां त्यांचें वजन सरासरी ६ पौंडांनीं वाढलें असल्याचें आढळून आलें.

**म्हैसूरमधील बस सर्व्हिस**—म्हैसूर शहरांतील बसची वहातूक आतांपर्यंत खाजगी मालकीची होती. परंतु म्हैसूर सरकारनें ती आतां आपल्या ताब्यांत घेतली आहे. चालू महिन्याच्या दोन तारखेपासून सरकारच्या मालकीच्या १० बसेस शहरांतील रस्त्यांवर धांवू लागल्या. वर्षाअखेर बंगलोर शहरांतील बस वाहतूकहि सरकार आपल्या ताब्यांत घेण्याचा संभव आहे.

**विजेवरील सरचार्ज वाढणार**—अहमदाबाद वीजकंपनीनें मोठ्या प्रमाणावर वीज वापरणारांपासून घेण्यांत येणारा सरचार्ज ८३ टक्क्यांनीं वाढविण्याचें ठरविलें आहे. गिरण्या व कारखाने ह्यांना ही वाढ १ नोव्हेंबरपासून लागू करण्यांत येणार आहे. ह्या वाढीमुळें कंपनीस २५ लाख रुपयांचें जादा उत्पन्न होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**परदेशीय डॉक्टर्सचा दौरा**—अमेरिकेंतील व युरोपमधील नऊ देशांमधील कांहीं डॉक्टर्स भारताचा ४ आठवड्यांचा दौरा करण्यासाठीं येणार आहेत. भारत व इतर देश ह्यांच्यामधील वैद्यकीय संबंध दृढतर करण्यासाठीं दौरा काढण्यांत आला आहे. ब्रिटनमधील प्रसिद्ध डॉ. हिंगोराणी ह्यांनीं तो पुरस्कृत केला आहे.

**संगीतविषयक शिष्यवृत्त्या**—डिसेंबर महिन्यांत कलकत्ता येथील ऑल इंडिआ म्युझिक कान्फरन्स ट्रस्टतर्फे तानसेन—विष्णुदिगंबर शिष्यवृत्त्यांसाठीं परीक्षा घेण्यांत येणार आहेत. यशस्वी स्पर्धकांसाठीं १,१०० रुपयांच्या दोन शिष्यवृत्त्या व इतर बक्षिसें ठेवण्यांत आलीं आहेत. गायनाच्या व वाद्यवादनाच्याहि स्पर्धा लावण्यांत येतील.

**चार्टर्ड अकौंटंटसची परीक्षा**—चार्टर्ड अकौंटंटसच्या परीक्षेला बसलेल्या पण नापास झालेल्या विद्यार्थ्याला दर पेपरामागें २५० रुपये भरून आपल्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी नियमाप्रमाणें करून घेतां येते. ही रक्कम देऊन कांहीं विद्यार्थ्यांनीं फेरतपासणी करवून घेतली असतां त्यांना यशस्वी म्हणून जाहीर करण्यांत आलें.

**बिहार सरकाची मदत**—ओरिसा राज्यांतील जलप्रलयांत सांपडलेल्या लोकांना मदत करण्यासाठीं बिहार सरकारनें ५०,००० रुपयांचा गहूं पाठविण्याचें ठरविलें आहे. त्याशिवाय तितक्याच रकमेचें कापड, म्हणजे मुख्यतः धोतरें व साड्या ह्यांचाहि पुरवठा करण्याचा निर्णय घेण्यांत आला आहे.

**बँक कामगारांची मागणी**—ऑल इंडिआ बँक एंप्लॉयीज असोसिएशननें राष्ट्राध्यक्षांना एक खलिता सादर करून बँक निवाड्यांतील शिफारसी अंमलांत आणण्यापूर्वी त्यांत एक दुरुस्ती करण्यांत यावी अशी मागणी केली आहे. नोकरांच्या सध्याच्या पगारांत कपात करण्यांत येऊं नये अशी ही दुरुस्ती आहे. बँक निवाड्यावर आधारलेला कायदा आहे तसाच अंमलांत आणल्यास १५,००० नोकरांचे पगार कमी होतील, अशी भीति असोसिएशननें व्यक्त केली आहे.

**भारताची पुस्तकांची निर्यात**—भारत डॉलर्सच्या कक्षेंतील देशांना जितकीं पुस्तकें अगर नियतकालिकें निर्यात करतो त्यापेक्षा त्या देशांकडून अधिक प्रमाणांत आयात करतो. पौंडाच्या कक्षेंतील देशांना मात्र भारताकडून आयातीपेक्षा निर्यात अधिक करण्यांत येते.

**तांदुळाची निर्यात**—सप्टेंबरअखेर संपलेल्या ११ महिन्यांच्या कालांत भारतानें ८०,००० टन तांदुळाची निर्यात केली. तांदुळाची किंमत ५·२५ कोटी रुपये होती. १२ वर्षांनंतर गेल्या नोव्हेंबर महिन्यांत मध्यवर्ती सरकारनें तांदुळाच्या निर्यातीची प्रथमच परवानगी दिली होती. १९५५ च्या सप्टेंबर अखेर २,००,००० टन तांदूळ निर्यात करण्याची परवानगी देण्यांत आली होती.

**अमेरिकन कारखान्यांकडे मागण्या**—गेल्या ऑगस्ट महिन्यांत भारताकडून ९ अमेरिकन कारखान्यांकडे मिळून ५ लाख डॉलर्स किंमतीच्या यंत्रसामुग्रीच्या मागण्या नोंदविण्यांत आल्या. ड्रिलिंग टूल्स, डिझेल एंजिनें, इत्यादि मालाच्या ह्या मागण्या आहेत.

# दुसरी पंचवार्षिक योजना
## (४)
### रोजगारी आणि मोठे व छोटे उद्योगधंदे

२४. काम करण्यास पात्र व्यक्तींची देशांतील संख्या १९५०–५१ मध्यें अंदाजें १४·३ कोटी असावी असा अंदाज आहे. सध्यां ही संख्या १५·२ कोटीवर गेली असून, १९६०–६१ मध्यें ती १६·३ कोटी होईल असा अंदाज आहे. प्रचलित बेकारीबाबतचें (अपुऱ्या रोजगारीचा यांत अंतर्भाव नाहीं) अंदाज वेगवेगळे असून त्या बाबतींतील सर्वांत कमी अंदाजी आंकडा ३० लक्ष बेकार असा आहे. यांपैकी सुमारें १० लक्ष किंवा त्याहून अधिक व्यक्ति नागरी विभागांतील असून बाकीच्या ग्रामीण विभागांतील आहेत. निरनिराळ्या उद्योगविनिमय केंद्रांत नोंदणी केलेल्या बेकारांची संख्या मार्च १९५१ मध्यें ३·४ लक्ष व्यक्ति होती ती मार्च १९५५ पर्यंत वाढून सुमारें ६ लक्ष झाली. ही वाढ बेकारीचा वाढता प्रश्नच दिग्दर्शित करते. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतींत काम करण्यास पात्र असलेल्या बाबतींत संख्या नागरी विभागांत सुमारें ५० लक्षांनीं आणि ग्रामीण विभागांत ६० लक्षांनीं वाढेल असा अंदाज आहे.

### सरकारी क्षेत्रांत वाढ

२५. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत घरगुती स्वरूपाच्या व हातानें करतां येणाऱ्या धंद्यांचा खास दृष्टिकोनांतून विचार केलेला आहे. त्यानुसार सरकारी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांत भांडवल गुंतवून आणि आरोग्यासाठी, शिक्षणासाठी व समाजसेवेच्या कार्यासाठी अधिक खर्च करून जनतेची क्रयशक्ति वाढविणें व चलनवाढीचें अनिष्ट दडपण येऊं नये म्हणून वस्तूंचा योजनाबद्ध रीतीनें पुरवठा होण्याची तरतूद करून ग्राहकोपयोगी वस्तूंची वाढती मागणी पुरी करणें या गोष्टी मूलभूत महत्त्वाच्या मानलेल्या आहेत. राष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेचा विकास हा भांडवल उभारणीची शक्ति सर्वसामान्यतः वाढविणाऱ्या कोळसा, वीज, लोखंड व पोलाद, अवजड यंत्रसामुग्री, हेव्ही केमिकल्स व अवजड उद्योगधंदे यांच्या वाढत्या उत्पादनावर अवलंबून राहील. ह्या उद्योगधंद्यांची वाढ मुख्यतः सरकारी क्षेत्रांतच व्हावयाची आहे. अवजड उद्योगधंद्यांमुळें भांडवल गुंतविण्यास उत्तेजन मिळेल, परंतु रोजगारास मात्र त्यांत त्या मानानें वाव वेताचा राहील. तोंच, या उद्योगधंद्यांमुळें ग्राहकोपयोगी मालाची मागणी वाढत जाईल, पण प्रत्यक्ष त्या धंद्यांतून मात्र हा माल पुरवितां येणार नाहीं. वाढती क्रयशक्ति व त्यामुळें वाढत जाणारी ग्राहकोपयोगी वस्तूंची मागणी ही घरगुती उद्योगधंदे किंवा हस्तव्यवसाय यांची वाढ करून त्यांच्याद्वारां शक्य तितकी वाढवून पुरविली पाहिजे. यामुळें देशांत सर्वत्र कामाचें प्रमाणहि त्वरित वाढेल.

### रोजगारांत वाढ

२६. योजनेच्या कच्च्या मसुद्यांत आणखी ११० लक्ष लोकांना रोजगार मिळूं शकेल असा अंदाज केला असून त्याची विभागणी पुढीलप्रमाणें आहे.

| | (लक्ष रु.) |
|---|---|
| शेतकी आणि अनुषंगिक धंदे | १५ |
| खाणी व कारखाने | १७ |
| उद्योगधंदे व बांधकामें | ३० |
| दळणवळण, रेल्वे, बँका व विमा कंपन्या | ४ |
| घाऊक व किरकोळ व्यापार, वाहतूक (रेल्वे वगळून) इ. | २० |
| व्यवसाय, नोकऱ्या (सरकारी, कारभारविषयक व बाकीच्या) | ४ |
| | ११० |

मध्यवर्ति आणि राज्य सरकारांनीं तयार केलेल्या कार्यक्रमांतील आंकड्यांशीं व एकेक उद्योगधंदा घेऊन हे अंदाज कांहींशा तपशीलांत ताडून पाहण्यांत येत आहेत. अखेरीस या नव्या रोजगारांपैकी ते पुढेंहि चालू राहतील अशा आणि बांधकामावरील कामासारखे तात्पुरते रोजगार आणि अपुरा रोजगार असलेल्या वर्गांतील लोकांना मिळालेले रोजगार यांत फरक करणें जरूर ठरेल. योजनेच्या कच्च्या मसुद्यांत मांडलेल्या सूचना आधारभूत धरूनहि, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतींत, त्या योजनेमुळें वाढत्या श्रमशक्तीस संपूर्ण रोजगार मिळेलच असें सूचित करतां येणार नाहीं. कारण हे अंदाज कांहीं महत्त्वाच्या अपेक्षांवर अवलंबून आहेत.

### कर्वे समितीचें कार्य

२७. तुमच्या पंचवार्षिक योजनेचें एक अविभाज्य अंग म्हणून ग्रामोद्योग व छोटे उद्योगधंदे यांचा विकास साधण्यासाठी एक सर्वसामान्य योजना आंखण्याकरितां नियोजन मंडळानें अलिकडेच प्रा. डी. जी. कर्वे, श्री. वैकुंठलाल मेहता व प्रा. धनंजयराव गाडगीळ यांची खास समिति नेमली आहे. पुढील हेतु समोर ठेवून या समितीनें ही योजना तयार करावयाची आहे. (१) सर्वांस मागणी असलेल्या ग्राहकोपयोगी वस्तूंचें उत्पादन वाढविणें. (२) रोजगाराचें प्रमाण शक्य तितकें वाढविणें आणि (३) उत्पादन व खरेदीविक्री ही मुख्यतः सहकारी तत्त्वावर संघटित करणें. ही समिति सध्यां ह्या प्रश्नांचा अभ्यास करीत आहे.

---

### श्री. वि. ग. करमरकर ह्यांचा मृत्यु !

"अर्थ"च्या प्रकाशनाशीं अगदीं पहिल्या अंकापासून संबंध असलेले, श्री. विनायक गणेश ऊर्फ दादा करमरकर, हे मंगळवार दि. ४ ऑक्टोबर रोजीं सकाळीं ८–३० वाजतां वयाच्या ६३ व्या वर्षी एकाएकी हृदयक्रिया बंद पडून मृत्यु पावले, हें नमूद करण्यास अत्यंत दुःख होतें. आर्यभूषण मुद्रणालयाची त्यांनीं सन १९१३ पासून सतत ४२ वर्षे एकनिष्ठ सेवा केली. सात्त्विक वृत्ति आणि सदाचार, त्याचप्रमाणें निरोगी प्रकृति ह्यामुळें त्यांचा स्नेह सर्वांनाच हितकारक व आल्हाददायक असे. त्यांचे कनिष्ठ बंधु श्री. हेरंब व त्यांची कुटुंबीय मंडळी ह्यांचे दुःखांत आम्ही सहभागी आहों; श्री. दादांच्या मृत्यूमुळें एक आदर्श नागरिक व मित्र नाहींसा झाला आहे.

---

### हुबळी येथें औद्योगिक सहकारी बँक

मुंबईचे सहकार मंत्री श्री. म. पु. पाटील यांच्या हस्तें हुबळी येथें ता. ३ ऑक्टोबर रोजीं धारवाड जिल्हा औद्योगिक सहकारी बँकेचें उद्घाटन झालें. सदरहू बँकेस शेअर भांडवलाच्या रूपानें सरकारकडून आर्थिक मदत मिळणार असून ती उद्योगधंद्यांना कर्जें देईल व मालाची विक्री करण्याबाबतींत मदत करील.

---

**परदेशी प्रवासी आकर्षिण्यासाठी—** दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत परदेशीय प्रवाशांना भारतांत प्रवास करण्यास उत्तेजन देण्याच्या हेतूनें भारतीय सरकारनें ३·५ कोटी रुपये त्यांच्या सुखसोयींसाठी खर्च करण्याचें ठरविलें आहे. १९५४ सालीं भारतांत आलेल्या परदेशी प्रवाशांमुळें देशाला ५ कोटी रुपये किंमतीचें परदेशी चलन प्राप्त झालें होतें.

**इजिप्त–झेकोस्लोव्हाकिआ व्यापारी करार—** इजिप्त व झेकोस्लोव्हाकिआ ह्यांच्या दरम्यान व्यापारी कराराच्या वाटाघाटी लवकरच सुरू होणार आहेत. इजिप्तमध्यें हातीं घेण्यांत आलेल्या औद्योगिक योजनांना झेक सरकारचें साह्य घेण्यासंबंधीं चर्चा करण्यांत येणार आहे.

# अर्थ

बुधवार, ता. ११ ऑक्टोबर, १९५५





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अमेरिकेंत बँकांचें एकत्रीकरण

अमेरिकेंत बँकांच्या एकत्रीकरणास बरीच चालना मिळालेली आहे. १९५५ च्या पहिल्या सहामाहींत ११० बँकांचें एकत्रीकरण झालें. १९२९ ते १९४८ ह्या मुदतींत अमेरिकन कारखानदारांची जिंदगी १६०% वाढली, पण त्यांना कर्ज पुरविण्याचें बँकांचें सामर्थ्य त्या प्रमाणांत वाढलें नाहीं. त्यामुळें कर्ज देण्याचा धंदा बऱ्याच प्रमाणांत विमा कंपन्यांकडे गेला. एकाच कारखान्याला बँक आपल्या ठेवींच्या ठराविक प्रमाणापेक्षा अधिक कर्ज देत नाहीं, पण बँकांचें एकत्रीकरण झालें कीं ह्या प्रमाणाच्या हिशेबानेंच कितीतरी मोठी रक्कम कर्जाऊ देणें शक्य होतें. मोठीं कर्जें देत असतांनाच, लहान लहान कर्जेंहि दिलीं पाहिजेत व त्यासाठी नव्या शाखा उघडायला हव्यात. ज्या ठिकाणीं पुरेशा बँक कचेऱ्या आहेत, तेथें नव्या कचेऱ्या उघडण्यास परवानगी मिळत नाहीं. पण बँकांचें एकत्रीकरण झालें, कीं तयार शाखा-कचेऱ्या हातीं येतात. उदाहरणार्थ, न्यूयॉर्कच्या चेस नॅशनल बँकेच्या फक्त २९ कचेऱ्या होत्या, तिच्याशीं बँक ऑफ मॅनहॅटन आपल्या ६७ कचेऱ्यांसह विलीन झाली. बँकांच्या एकत्रीकरणामुळें त्यांच्यांतील स्पर्धा कमी न होता वाढलीच आहे. चार सर्वांत मोठ्या बँकांकडे सर्व ठेवींपैकी ६०% ठेवी आहेत; आणि एकत्रीकरण बहुधा लहान बँकांचेंच झालेलें आहे. कांहीं १० वर्षे मुदतीच्या कर्जावरील व्याजाचा दर ३½% चा ३% वर आला आहे.

## सहकारी चळवळीच्या प्रसाराची आवश्यकता

मुंबई सरकारचे सहकार-मंत्री श्री. एम्. पी. पाटील ह्यांनीं धारवाड जिल्ह्यांतील रूरल क्रेडिट योजनेचें उद्घाटन केलें. ह्या प्रसंगीं भाषण करतांना ते म्हणाले, कीं सहकारी संस्था ह्या केवळ धंदे करणाऱ्या नसतात, तर सहकारी जीवनाच्या दृष्टिकोनाच्या प्रतीकहि असतात. समाजवादी पद्धतीची समाजरचना सहकारी जीवनावांचून स्थापन करतां येणार नाहीं. सहकारी चळवळ ही शेतकऱ्यांत पसरलेली आहे आणि तीहि पतीचे व्यवहार करण्यापुरती आहे. पण सहकाराची व्याप्ति वाढून त्यानें सर्व समाजांत व समाजाच्या सर्व व्यवहारांत प्रवेश केला पाहिजे. इतकेंच नव्हे, ह्यापुढें होणारें औद्योगीकरणहि सहकाराच्या आधारानें झालें पाहिजे. कर्नाटकाच्या जिल्ह्यांत सहकारी चळवळीची प्रगति झपाट्यानें झाली आहे. धारवाड जिल्ह्यांतील शेतकऱ्याला जितके व्यवहार पतीवर करावे लागतात, त्यापैकी ४० टक्के व्यवहार सहकारी संस्थांच्या साह्यानें केले जातात. शेतकऱ्याला करावे लागणारे पतीचे सर्व व्यवहार सहकारी पद्धतीनें करतां यावे म्हणून जी पुनर्घटना करण्यांत येत आहे, तिचाच एक भाग म्हणून वरील योजना सुरू करण्यांत आली आहे. श्री. पाटील ह्यांच्या भाषणापूर्वी कर्नाटक सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष श्री. बसवनलाल ह्यांनीं बँकेच्या सभासदांच्या कार्याच्या वाढीची कल्पना दिली. ते म्हणाले, कीं बँकेच्या सभासदांच्या यादीवर आतां ९७१ संस्था आणि २,५१२ व्यक्ती यांचीं नांवें आहेत. येत्या पांच वर्षांत जिल्ह्यांतून जितक्या शेतमालाचें उत्पादन होतें, त्यापैकी एकतृतीयांश मालाची विक्री सहकारी संघटनांच्या मार्फत करण्यांत येईल असा भरंवसा मला वाटतो.

## शेतीच्या मालाच्या किंमतींची स्थिरता

शेतीच्या मालाच्या किंमतींतील चढ-उतारांची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या कमिशननें जी प्रश्नपत्रिका पाठविली होती तिला फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनें आपलें उत्तर धाडलें आहे. शेतीच्या मालाच्या किंमती स्थिर करण्यासाठी केवळ किमान किंमती ठरवून देण्याचा एकच एक उपाय अमलांत आणण्यास फेडरेशननें विरोध केला आहे. किंमतींना असा आधार दिल्यामुळें मागणी व पुरवठा ह्याच्याकडे दुर्लक्ष होईल आणि शेतीच्या उत्पादनांत ठराविक साचा उत्पन्न होईल अशी भीतीहि उत्तरांत व्यक्त करण्यांत आली आहे. फेडरेशननें असें म्हटलें आहे, कीं वरील उपायाऐवजीं रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीनें ज्या शिफारसी केल्या आहेत त्या अंमलांत आणाव्या. त्यामुळें ग्रामीण भागांतील पतीच्या व्यवहारांना आणि बाजारांतील व्यवहारांना अधिक बळकटी लाभेल. ह्या कामीं पुरेशा गुदामांची व्यवस्था करण्यांत आली तर फारच फायदा होईल. हंगामाच्या काळांत शेतीच्या मालाच्या किंमती पडण्याची प्रवृत्ति दिसते. ही प्रवृत्ति कमी जोरकस करण्यासाठी निर्यात मालासंबंधींच्या सूचनांची वेळ बदलून पहाण्यांत यावी. शिवाय अन्नधान्याची खरेदी करण्यासाठी योग्यवेळीं सरकारनें बाजारपेठेंत यावें. सध्यां लागवडीखालीं असलेल्या जमिनींपैकी ७८ टक्के जमीन अन्नधान्याखालीं आहे. सुमारें २२ टक्केच जमीन व्यापारी व इतर पिकांसाठी शिल्लक रहाते. देशांतील आर्थिक विकास व आहारासंबंधी लोकांच्या रुचींत होणारे बदल ह्यामुळें दूध व दुधाचे पदार्थ ह्यांची मागणी वाढणार आहे. म्हणून लागवडीच्या बाबतींत अधिक समतोलपणा राखला जाणें जरूर आहे.

**रशिआची पोलाद उत्पादनाची पद्धत**—रशिआंतील पोलादाच्या कारखान्यांची पहाणी करण्यासाठी गेलेल्या प्रतिनिधीमंडळाचे नेते, श्री. दत्त, ह्यांनीं असें मत व्यक्त केलें आहे कीं भिलई येथें काढण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्याची उत्पादनपद्धति रशिअन कारखान्यांसारखी ठेवणें आवश्यक आहे. भारतांतील उत्पादनपद्धतीपेक्षा रशिआंतील उत्पादनपद्धति बरीच अधिक यांत्रिक आहे.

**सुताची सहकारी गिरणी**—लिंबडी येथें सहकारी तत्त्वावर सुताची गिरणी काढण्याचे प्रयत्न चालू आहेत. लिंबडी गांवाजवळचा भाग कापूस पिकविणारा असून आसपास विणकरांची बरीच वसती आहे. त्यांच्या दृष्टीनें गिरणी फार फायदेशीर होईल. गिरणीचें भांडवल ५० लाख रुपयांचें असेल. आंध्रमध्यें अशीच एक सहकारी गिरणी चालू आहे.

## कारवारमधील जंगलांत कागदाचा व लगद्याचा नवा कारखाना

### अर्जे मागविण्यांत आले

कारवारच्या जंगलांत मुंडगोल भागांत एक कागद व लगदा तयार करण्याचा कारखाना स्थापन करण्यास परवानगी देण्याचें मुंबई सरकारनें ठरविलें आहे. या कारखान्यामध्यें कच्चा माल म्हणून बांबूंचा उपयोग केला पाहिजे. निरनिराळ्या ठिकाणीं वाळलेल्या बांबूंचें उत्पन्न अनुक्रमें पुढीलप्रमाणें आहे. गंगवली पाणलोटाचा प्रदेश ( ३०,००० टन आणि १५,००० टन ); काळी नदी पाणलोटाचा प्रदेश ( १४,००० टन आणि ७,००० टन ) आणि कारवार पूर्व विभागांतील मुंडगोल जंगलाचा प्रदेश ( ६०,००० टन आणि ५०,००० टन ). शिवाय मुंड पठारावर सुक्या बांबूचें वार्षिक सरासरी उत्पन्न ८,००० टन इतकें आहे.

ज्या कारखानदारांना या प्रश्नाबावत आस्था असेल त्यांनीं अधिक माहितीसाठी कॉन्झर्वेटर ऑफ फॉरेस्टस् रिसर्च अँड वर्किंग प्लॅन्स सर्कल, पुणें यांच्याकडे विचारणा करावी.

ही सवलत मिळवूं इच्छिणाऱ्या अर्जदारांनीं आवश्यक ती माहिती दिली पाहिजे:—( १ ) कंपनीचें अथवा व्यक्तीचें अथवा व्यक्तींचीं पूर्ण नांवें; ( २ ) उपलब्ध भांडवल. संबंधित कंपनीची किंवा व्यक्तीची आर्थिक परिस्थिति कशी काय आहे याबद्दल विचारणा करतां यावी म्हणून बँकरचें नांवहि दिलें पाहिजे; ( ३ ) या अथवा तत्सम उद्योगधंद्यांतील अनुभव; ( ४ ) ज्या देशांतून यंत्रसामुग्री मागविण्यांत येणार असेल त्याचें नांव; ( ५ ) वाळलेल्या बांबूंच्या अथवा लगद्याच्या अथवा कारखान्यांत वजन केलेल्या कागदाच्या दर टनामागें जंगल खात्याला कोणत्या दरानें रॉयल्टी देण्यांत येईल.

अर्जाबरोबर चेकनें अथवा सरकारी चलनाच्या रूपानें १०,००० रुपये अनामत म्हणून पाठविले पाहिजेत. अर्ज नाकारण्यांत आला तर ही रक्कम परत करण्यांत येईल. परंतु अर्ज स्वीकारण्यांत आल्यानंतर संबंधित पक्षानें करार केला नाहीं किंवा करारांतील अटी पाळल्या नाहींत तर ही रक्कम जप्त करण्यांत येईल. कारण न देतां कोणताहि अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार सरकारनें राखून ठेवला आहे.

---

**भिलई येथील कारखान्यांतील यंत्रसामुग्री**—मध्यप्रदेशांत भिलई येथें काढण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्याची यंत्रसामुग्री तयार करण्यासाठी १०० सोव्हिएट एंजिनिअर्स काम करीत आहेत. यंत्रसामुग्री अगदीं अद्यावत् प्रकारची करण्यांत येत आहे आणि ती अशा स्वरूपाची बनविण्यांत येत आहे कीं उत्पादनांत अधिक वाढ करणें पुढें शक्य व्हावें.

**यंत्रमागांच्या धंद्याबाबत चौकशी**—मुंबई राज्यांतील यंत्रमागांचा धंदा आणि त्या धंद्याचे हातमागाच्या धंद्यावर होणारे परिणाम ह्यासंबंधीं चवकशी करण्यासाठी राज्य-सरकारनें सहाजणांची एक कमिटी नेमली आहे. मुंबई राज्यांतच यंत्रमागाचा धंदा केंद्रित झालेला आहे. चौकशी कमिटी नेमण्याची शिफारस कानुगो टेक्स्टाइल इन्क्वायरी कमिटीनें केली होती.

**पैसे बाहेर पाठविण्यास बंदी**—पश्चिम आफ्रिकेंत अंगोला भागांत आणि पूर्व आफ्रिकेंत मोझँबिक ह्या भागांत भारतीय व्यापारी आहेत. हे दोन्ही प्रदेश पोर्तुगालच्या सत्तेखालीं आहेत. लिस्बनहून पोर्तुगाल सरकारनें काढलेल्या हुकुमाप्रमाणें, भारतीय व्यापाऱ्यांना ह्या प्रदेशांच्या हद्दीबाहेर पैसे पाठविण्यास मनाई करण्यांत आली आहे.

## " स्त्री " मासिकाचा रौप्यमहोत्सव

" स्त्री " मासिकाचा सप्टेंबर, १९५५ चा अंक रौप्यमहोत्सव विशेषांक म्हणून प्रसिद्ध करण्यांत आला आहे, तो प्रसंगास साजेसा असाच आहे. गेल्या २५ वर्षांतील बदललेल्या स्त्रियांच्या परिस्थितीचा आढावा घेऊन त्यांना कोणत्या मार्गानें जावयाचें आहे, याचें दिग्दर्शन या महत्त्वाच्या प्रसंगीं करणें योग्य होईल. ह्या दृष्टीनें अनुभवी व विचारवंत लेखक बंधु-भगिनींच्या लेखांची योजना संपादकांनीं करून बहुतेक महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधीं मार्गदर्शन करविलें आहे. डॉ. कमलाबाई देशपांडे, सौ. शांताबाई भांडारकर, श्री. वि. स. खांडेकर, श्री. श्री. वा. काळे, श्री. य. गो. नित्सुरे, सौ. इंदिराबाई देवधर, सौ. प्रतिभा पटवर्धन, सौ. मालती दांडेकर व सौ. पद्मा गोळे ह्यांचे महत्त्वपूर्ण लेख, प्रौढ कुमारिकांच्या विवाहाचे प्रश्नावर परिसंवाद, स्त्री मासिकाची वाटचाल, इत्यादि साहित्यानें अंक वाचनीय व संग्रहणीय झाला आहे. 'महाराष्ट्रीय भगिनींची विविध कार्यक्षेत्रें' ह्या चित्रावलींतील नानाविध क्षेत्रांतील महाराष्ट्रीय स्त्रियांचें ओझरतें दर्शन कितीतरी स्फूर्तिदायक आहे; त्यांतील सतेज चेहेरे त्यांच्या ह्यापुढील प्रगतीची ग्वाही देतात.

'स्त्री' मासिकानें महाराष्ट्रीय स्त्रीविषयक विचारसंक्रमणास मोठाच हातभार लावला आहे; एवढेंच नव्हें तर त्यांना प्रत्यक्ष कार्यप्रवण केलें आहे. वेगवेगळ्या प्रांतांत महाराष्ट्रीय स्त्रिया जाऊन आज यशस्वी रीतीनें तेथें व्यवसाय करीत आहेत; आपल्या चारित्र्यानें व कर्तव्यदक्षतेनें त्यांनीं लौकिक मिळविला आहे. 'स्त्री' मासिकानें दिलेली चालना व धीर, ह्याला त्या कामीं फार मोठें श्रेय आहे. 'स्त्री'च्या मार्गदर्शनानें कितीतरी स्त्रियांना योग्य वाट सांपडली आहे, व त्यांच्या अनुभवानें व उदाहरणानें इतर स्त्रियांना पुनः प्रोत्साहन मिळालेलें आहे. अशा रीतीनें, स्त्रियांचें मनोरंजन करीत करीत त्यांना 'स्त्री' मासिकानें तेजस्वी बनविलें आहे, पण त्यांची शालीनता कायम राखली आहे. महाराष्ट्राच्या सामाजिकच नव्हे, तर आर्थिक जीवनांतहि जें अनुकूल स्थित्यंतर होत आहे, त्याबद्दल महाराष्ट्रीयांनीं 'स्त्री' मासिकाचें कायम ऋणी राहावें, अशी त्या मासिकाची कामगिरी आहे. लोकमत तयार करण्याचें काम अवघड असतें व त्याला अनेक अडचणींतून परिश्रमपूर्वक मार्ग काढावा लागतो; तें करीत असतांना ध्येयनिष्ठाहि टिकवी लागते. २५ वर्षें सतत श्री. शंकरराव किर्लोस्करांनीं हें कार्य केलें आहे व कार्यकारी संपादक श्री. मुकुंदराव किर्लोस्कर ह्यांनीं ती धुरा आतां सहजतेनें उचलली आहे, त्यामुळें 'स्त्री'ची ह्यापुढील प्रगति व तिचें कार्य इष्ट गतीनें चालेल, असा विश्वास वाटतो. 'स्त्री'च्या कार्याची तुलना श्री. आण्णासाहेब कर्वे ह्यांच्या कार्याशींच फक्त होऊं शकेल, असें म्हटल्याखेरीज राहावत नाहीं; दोघांनींहि महाराष्ट्रीय स्त्रीचा दुबळेपणा घालवून, तिला स्वाभिमानी बनवून समाजांत व कुटुंबांत योग्य स्थान मिळवून देण्याची शिकस्त केली आहे. रौप्यमहोत्सव अंकांत, संपादक श्री. शं. वा. किर्लोस्कर ह्यांचें श्री. आण्णासाहेब व सौ. बाया कर्वे ह्यांच्या समवेत काढलेलें छायाचित्र दिलें आहे, तें आम्हांस अत्यंत अर्थपूर्ण वाटतें.

---

**इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह बँकेची स्थापना**—मुंबई सरकारचे सहकार मंत्री श्री. एम्. पी. पाटील ह्यांनीं हुबळी येथें पहिल्या इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह बँकेचें उद्घाटन केलें. छोट्या धंद्यांना आर्थिक मदत करून बेकारी कमी करण्यासाठी बँक स्थापन करण्यांत आली आहे. छोट्या उद्योगधंद्यांना भांडवलाचा व कच्च्या मालाचा पुरवठा करणें आणि पक्क्या मालाची विक्री करणें, ही बँकेचीं प्रमुख कार्यें राहातील.

## सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

### श्री. वा. पुं. वर्दे यांचें अध्यक्षीय भाषण

गेलें व्यावसायिक वर्ष अनेक कारणांनीं अत्यंत समाधानाचें त्याचप्रमाणें युद्धोत्तर कालांत अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण होतें. आंतरराष्ट्रीय राजकीय वातावरणांत फारच बदल घडून आला. राष्ट्राराष्ट्रांतील तेढींतील कांहीं विवाद्य मुद्दे कालहरणानेंच निकालांत निघाले आणि पुष्कळसे सहानुभूतिपूर्वक विचारविनिमय व बैठकी वगैरेंनीं निकालांत काढले गेले.

आंतरराष्ट्रीय सभांत एरव्हीं दिसून येणारी स्फोटक परिस्थिति या काळांत कमी दिसून आली व एकंदर आंतरराष्ट्रीय राजकारण सहिष्णुतेच्या पार्श्वभूमीवर खेळलें गेलें. आपणांस अभिमान वाटला पाहिजे कीं, आपल्या भारतानें व विशेषतः भारताचे लोकप्रिय पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीं पुष्कळसे पेंचप्रसंग कुशलतेनें हाताळून शांतिकार्याचे प्रगतींत अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली.

जागतिक आर्थिक क्षेत्रांतहि अनेक महत्त्वाच्या घडामोडी झाल्या. उत्पादनांत बरीच वाढ झाली. व्यापार बराच खुला झाला. चलनांतहि जरा मोकळेपणा आला. एकंदरींत आर्थिक व सांपत्तिक स्थैर्य या वर्षीं जास्त प्रमाणांत दिसून आलें.

मोठमोठ्या धंद्यांतीलच नव्हे तर शेतकींतीलहि उत्पादन वाढल्यामुळें व्ययशक्तीहि वाढली व त्यामुळें नियंत्रणें काढलीं गेलीं. अन्नधान्याच्या वाढीचें प्रमाण इतकें होतें कीं, किंमतींत घट होणें अपरिहार्यच ठरलें. या घटीमुळें झालेली शेतकऱ्यांची कुचंबणा राष्ट्राच्या निर्यात धोरणानें अंशतः तरी कमी झाली. अन्नधान्य किंमतींच्या घटीमुळें इतर उद्योगधंद्यांच्या उत्पादन-खर्चावरही परिणाम झाला असता पण ही शक्यता लेबर अवार्डांच्या योजनांनीं दुरावली.

आपल्या आर्थिक व औद्योगिक उन्नतीकरितां भारतानें ज्यास मिश्र आर्थिक रचना म्हणतां येईल अशा तत्त्वाचा स्वीकार केलेला आहे, जेणेंकरून समाजाची वैयक्तिक आणि सामुदायिक अंगें समानतेनें तसेंच परस्परानुषंगानें आपापली आर्थिक उन्नति करीत राहतील. या वर्षीं विशेषतः सामुदायिक अर्थव्यवस्थेवर विशेष लक्ष देण्यांत आलेलें आहे, असे कायदेकानू व धोरणांचीं निवेदनें यावरून दिसून येतें.

आवडी कॉंग्रेसनें समाजवादी अर्थरचना हें ध्येय ठरविलें. या ध्येयाच्या परिपूर्ततेसाठीं घटनेच्या ३१ व ३१ अ या कलमांत दुरुस्ती करणें जरूरीचें वाटलें. ह्या दुरुस्तीमुळें, सरकारनें ताब्यांत घेतलेल्या मालमत्तेबद्दल नुकसानभरपाई लोकसभा ठरवील तेवढीच देण्यांत येईल. अशा रीतीनें लोकसभेनें दिलेला निकाल न्यायालयाच्या कक्षेबाहेर राहील.

अर्थव्यवस्थेची जबाबदारी सरकारनें आपल्यावर घेतल्यामुळें घटनेनें दिलेल्या मूलभूत हक्कांवरील निर्बंधांच्या सयुक्तिकतेबद्दल साशंकता व्यक्त करणें कदाचित् वाजवी होणार नाहीं. परंतु पुढील येणारें सरकार चालू सरकारचीं आश्वासनें पाळण्याची जबाबदारी घेईल किंवा नाहीं याबद्दल मात्र साशंकता निर्माण होते.

कंपनी विधेयक मूळ अपेक्षेपेक्षा जास्त तीव्रपणें तावूनसुलाखून निघालें. सरळमार्गी मनुष्यास कदाचित् कांहीं बदल जरी त्रासदायक नसले तरी किंचित् अडचणीचे वाटतील. पण या बदलामुळें आर्थिक विषमता बऱ्याच प्रमाणांत कमी होणार असल्यामुळें व सुष्टांपेक्षा दुष्टांवर बंधन घालण्याचा त्यामागील हेतु असल्यामुळें हें विधेयक स्वागतार्ह आहे. ज्यांना कायद्याबद्दल आदर आहे त्यांना भारताचे अर्थमंत्री श्री. देशमुख यांनीं आश्वासन दिलें आहे. श्री. देशमुख यांच्या शब्दांतच तें सांगावयाचें झाल्यास "मी एवढेंच आपल्याला आश्वासन देऊं इच्छितों कीं या कायद्याच्या अंमलबजावणींत तत्परता, जबाबदार वृत्ति, समजूतदारपणा, साहाय्य व सर्वांत श्रेष्ठ म्हणजे प्रामाणिकपणा व न्याय सदैव राहील."

कर चौकशी कमिशनचा अहवाल जहाल ध्येयवादास फारसा उत्साहित करणार नाहीं. पण अहवालांतील शिफारशी सर्वपक्षीय उन्नतीस पोषक अशा असून समतापूर्ण समाजाच्या घटनेस हातभारच लावतील. अर्थात् या शिफारशी अंमलांत आणण्यांत सरकारनें तारतम्यता दाखविली पाहिजे, आणि या तारतम्यतेच्या प्रमाणावरच यशापयश अवलंबून राहील.

एकच मुद्दा कीं ज्याला अजूनहि प्रभावी उत्तर सांपडलेलें नाहीं तो म्हणजे "बेकारी". या समस्येची पूर्ति त्वरित होण्यासारखी नसून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील नियोजित उद्योगधंद्यांतील वाढीमुळेंच या प्रश्नाची तीव्रता जराशी कमी व्हावयाचा संभव आहे. अर्थातच आपण हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे कीं औद्योगिक वाढ झाली तरी वाढत्या लोकसंख्येमुळें नोकऱ्यांची मागणीहि वाढेल व बेकारीचा प्रश्न पूर्णपणें सुटणें जरा कठीणच पडेल.

आपली ज्ञाति सुशिक्षित आहे–नोकरी हाच अद्याप आपला मुख्य पेशा. शिक्षणप्रसारानें कारकुनी व इतर नोकऱ्या या बाबतींत स्पर्धा निर्माण झाली आहे. स्थिर उत्पन्न व वाढता जीवनखर्च यांचा समन्वय करणें कठीण पडत आहे. अशा परिस्थितींत आपल्या समाजानें संकुचित कूपमंडुकवृत्ति सोडून नवनव्या क्षितिजावर दृष्टि रोखली पाहिजे. आपली बँक आपल्या समाजांतील लोकांस उद्योगधंद्यांचे बाबतींत आजपर्यंत मदत करीत आलेली आहे. पुढेंहि आपल्या बँकेचें हच धोरण राहील. अडीअडचणीच्या वेळीं तसेंच नियमित परतफेड होत असणाऱ्या कर्जांचे बाबतींत बँकेनें उदार धोरण ठेवलेलेंच आहे. अशा कर्जांच्या बाबतींतील बँक आकारीत असलेलें व्याज वास्तविक रीत्या फक्त २ टक्के पडतें.

बँकिंग जगतांत झालेल्या दोन महत्त्वाच्या घटनांचा उल्लेख करणें अप्रस्तुत होणार नाहीं. पहिली घटना म्हणजे इंपीरियल बँकेचें स्टेट बँक ऑफ इंडिया यांत झालेलें रूपांतर व दुसरी म्हणजे बँकनोकर तंट्याबाबत गजेंद्रगडकर लवादसमितीनें दिलेला निर्णय. इंपीरियल बँकेचें हें रूपांतर रिझर्व्ह बँकेच्या एका समितीच्या शिफारसीवरून केलेलें आहे व त्यांतील मुख्य उद्देश बँकांचें राष्ट्रीयकरण नसून बँकिंगच्या सुलसोयी लहान लहान गांवांना मिळण्याची व्यवस्था व्हावी हा आहे. अशा रीतीनें लोकांना बँकमार्फत व्यवहार करण्याची संवय लागल्यास सहकारी बँकांनाहि त्याचा फायदा झाल्याशिवाय रहाणार नाहीं. बँकांच्या तंट्यासंबंधीचें गजेंद्रगडकर अवॉर्ड सहकारी बँकांना बंधनकारक नाहीं. तथापि फारच रेंगाळलेल्या तंट्याचा न्यायमूर्ति गजेंद्रगडकर यांच्या निर्णयानें समाधानकारक शेवट होऊन बँकिंग जगतांत शांतता निर्माण होईल अशी आशा आहे. बँका आपली कार्यक्षमता बँकिंगच्या उर्जितावस्थेसाठीं सत्कारणीं लावून राष्ट्राच्या आर्थिक योजनेमुळें मिळणाऱ्या अपार संधीचा उपयोग करून घेतील, अशी उमेद बाळगण्यास हरकत नाहीं.

## श्री. चिन्मुळगुंद ह्यांचा सत्कार

श्री. पी. जे. चिन्मुळगुंद, आय. सी. एस्., कलेक्टर पुणें जिल्हा व माजी रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीज मुंबई राज्य, पुणें यांचा त्यांची बदली सेक्रेटरीएटमध्यें झाल्यामुळें पुणें जिल्हा सहकारी बोर्ड, पुणें जिल्हा सहकारी मध्यवर्ति बँक व पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ यांचेमार्फत पुणें जिल्हा सहकारी मध्यवर्ति बँकेनें ता. २७-९-५५ रोजीं मंगळवारीं दुपारीं ४॥ वाजतां श्री. बाबुराव सणस मेयर पुणें कॉर्पोरेशन यांचे अध्यक्षतेखालीं सत्कार करण्यांत आला. त्यावेळीं पुणें जिल्ह्यांतील सुमारें २५० कार्यकर्ते हजर होते. प्रथम श्री. जयवंतराव तुकाराम सावंत चेअरमन, पुणें जिल्हा सहकारी बोर्ड व पुणें जिल्हा सहकारी खरेदीविक्री संघ यांनीं सर्वांचें स्वागत केलें. श्री. चितळे, श्री. मुगुटराव काकडे, श्री. वि. ज. करंदीकर, श्री. बोरकर, श्री. के. डी. व्यवहारे, वगैरे सहकारी कार्यकर्त्यांनीं श्री. चिन्मुळगुंदांच्या गुणवर्णनपर भाषणें केलीं. चिन्मुळगुंदांनीं सध्यां सहकारी संस्थांवर नवीन कुळकायदा दुरुस्तीनें होणारा संभाव्य परिणाम, दुसरी पंचवार्षिक योजना व त्या दृष्टीनें सहकारी कार्यकर्त्यांची जबाबदारी यावर मार्गदर्शन केलें व त्यांनीं सहकारी चळवळीविषयींची सहानुभूति सदैव राहील असा निर्वाळा दिला. नंतर श्री. टिकेकर यांनीं सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपला.

## २७ राज्यांऐवजीं १६ राज्यें !


स्टेट्स रीऑर्गनायझेशन कमिशननें राज्यांची पुनर्रचना खालीलप्रमाणें सुचविली आहे. सध्यांच्या २७ राज्यांऐवजीं १६ राज्यें असावीत व तीन प्रदेशांचा कारभार मध्यवर्ती सरकारनें पहावा, अशी कमिशनची शिफारस आहे.

| राज्य | क्षेत्रफळ (चौ. मैल) | लोकसंख्या (लक्ष) |
|---|---|---|
| मद्रास | ५०,१७० | ३०० |
| केरळ | १४,९८० | १३६ |
| कर्नाटक | ७२,७३० | १९० |
| हैद्राबाद | ४५,३०० | ११३ |
| आंध्र | ६४,९५० | २०९ |
| मुंबई | १५१,३६० | ४०२ |
| विदर्भ | ३६,८८० | ७६ |
| मध्य प्रदेश | १७१,२०० | २६१ |
| राजस्थान | १३२,३०० | १६० |
| पंजाब | ५८,१४० | १७२ |
| उत्तर प्रदेश | ११३,४१० | ६३२ |
| बिहार | ६६,५२० | ३८५ |
| प. बंगाल | ३४,५९० | २६५ |
| आसाम | ८९,०४० | ९७ |
| ओरिसा | ६०,१४० | १४६ |
| जम्मू-काश्मीर | ९२,७८० | ४४ |
| | | (प्रत्यक्ष आकडे) |
| दिल्ली | ५७८ | १७,४४,०७२ |
| मणिपूर | ८,६२८ | ५,७७,६३५ |
| अंदमान-निकोबार | ३,२१५ | ३०,९७१ |


**पुण्याचें स्वागत लॉज**

पुण्याच्या "स्वागत लॉज"चे पाहुणे, म्हणजे चांगल्या गोष्टींचे पुरस्कर्ते असल्याची १०० टक्के खात्री !

स्वागत लॉजिंग-बोर्डिंग, डेक्कन जिमखाना, फोन ४०६०



★ हमाम स्ट्रीट येथें बँकेची फोर्ट शाखा २१ जूनपासून चालू झाली आहे. ★

**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक : श्री. वा. काळे

| मराठी | गुजराती |
|---|---|
| दुसरी आवृत्ति | दुसरी आवृत्ति |
| पृ. सं. १६८ ★ किं. १॥ रु. | तयार होत आहे. |

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.




## ग्रामीण भागांत कर्जे देण्याची सोय

### तीन जिल्ह्यांसाठी प्रायोगिक योजना

रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीच्या अहवालांत केलेल्या शिफारसी अंमलांत आणण्यासाठी मुंबई सरकार धारवाड, पूर्व खानदेश व भडोच या तीन जिल्ह्यांत एक प्रायोगिक योजना हातीं घेत आहे.

या योजनेसाठी सरकारनें चालू आर्थिक सालाकरितां सुमारें २७.५ लाख रुपये रजिस्टार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज यांच्या हवालीं केले आहेत.

रूरल क्रेडिट सर्व्हे कमिटीच्या सर्व शिफारसींचा अंतर्भाव व्हावा या दृष्टीनें ही प्रायोगिक योजना आंखण्यांत आली आहे. या शिफारसी पुढीलप्रमाणें आहेत:— ग्रामीण भागांत शेतकऱ्यांना अल्प मुदतीचीं, मध्यम मुदतीचीं व दीर्घ मुदतीचीं कर्जे देण्याच्या सोयींत वाढ करणें, शेतमालाच्या विक्रीचें नियमन करणें, कर्ज आणि विक्री यांची परिणामकारक रीतीनें सांगड घालणें, ग्रामीण भागांत कर्जपुरवठा करण्याच्या कामांत सरकारनें भाग घेऊन या कार्याची पुनर्घटना करणें, शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या संस्था स्थापन करणें, शेतीविषयक पत (मदत व हमी) आणि निधि निर्माण करणें, मोठ्या प्रमाणावर सहकारी शिक्षण देण्याची सोय करणें आणि या योजना सुरू केल्यामुळें सहकारी खात्यावर पडणारी जादा जबाबदारी पार पाडली जाण्याच्या दृष्टीनें जिल्ह्यांतील कारभाराविषयक यंत्रणेची पुनर्घटना करणें.

या तिन्ही जिल्ह्यांतील बहुतेक सर्व गांवें सध्यां सहकारी चळवळीखालीं आलीं आहेत. या चळवळींत सामील झालेल्या लोकसंख्येच्या बाबतींत धारवाड जिल्ह्यांत ४५ टक्के, पूर्व खानदेश जिल्ह्यांत ४७ टक्के आणि भडोच जिल्ह्यांत ३३ टक्के लोक या चळवळींत दाखल झाले आहेत. येत्या सहा वर्षांत धारवाड व पूर्व खानदेश जिल्ह्यांत शेतकऱ्यांची १०० टक्के लोकसंख्या (जमीन-मालक किंवा कुळें व त्यांचे कुटुंबीय) आणि भडोच जिल्ह्यांत ७५ टक्के लोकसंख्या या चळवळीखालीं आणण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. कर्जपुरवठा व मालाची विक्री यांची परिणामकारक रीत्या सांगड घालण्यासाठी पुरेशा पैशाची तरतूद करणें हें या योजनेचें आणखी एक वैशिष्ट्य आहे. कर्जपुरवठा करणाऱ्या निरनिराळ्या संघटनांची गरज भागावी म्हणून विविध कार्यकारी संस्था, मध्यवर्ती पैसा पुरविणाऱ्या संस्था, जमीन गहाण बँका, सहकारी विक्री संस्था, प्रोसेसिंग संस्था, इत्यादींना आर्थिक मदत देण्याचा विचार आहे.

विमान, आगबोट, रेल्वे, मोटार, आदि वाहनानें
केलेले विविध प्रवास, यात्रा व क्षेत्रांचीं
वर्णनें, प्रवासांत येणाऱ्या अडचणी,
तक्रारी व त्यांचें निरसन यांवर
सांगोपांग चर्चा करणारें

प्रवासी—मासिक

वा. व. म. ऑ. नें ३ रु. कोणत्याहि
महिन्यापासून वर्गणीदार होतां येतें.

प्रवासी कार्यालय, ९२८ सदाशिव पेठ, पुणें २.

### भांडवल गुंतविणारी आंतरराष्ट्रीय कंपनी

विकास योजनांत भांडवल गुंतविणारी एक कंपनी लंडन येथें स्थापन करण्यांत आली आहे. ही कंपनी ब्रिटिश कॉमनवेल्थ, युरोप व इतर देशांतून भांडवल गुंतविणार आहे. कंपनीचें नांव ट्रन्स ओशनिक डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन असें ठेवण्यांत आलें असून तिच्या भांडवलाचा भरणा अमेरिकन, कॅनेडिअन, ब्रिटिश आणि युरोपिअन बँकांनीं केलेला आहे. कंपनीचें अधिकृत भांडवल १ कोटी कॅनेडिअन डॉलर्स असून सुरवातीला ५० लाख डॉलर्सचें भांडवल वसूल करण्यांत आलें आहे. ह्या वसूल भांडवलापैकीं १० टक्क्याइतकें भांडवल लंडनमधील बँकांनीं उभारलेलें आहे. बँकेची मुख्य कचेरी कॅनडांत राहणार आहे. निरनिराळ्या देशांत भांडवलाची देवाणघेवाण व्हावी म्हणून जागतिक बँक आणि कॉमनवेल्थ डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ह्यासारख्या संस्था काम करीत आहेतच. अशाच प्रकारच्या कार्याला अधिक मदत करतां यावी म्हणून वरील कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत आली आहे. अमेरिका आणि कॅनडा हे दोन देश वगळून इतर देशांना नवीन भांडवल पुरविण्याचा कॉर्पोरेशनचा हेतु आहे. तथापि, भांडवल पुरविण्याच्या कामांत त्या त्या देशांतील स्थानिक भांडवलाचें व पैसे गुंतविणाऱ्या लोकांचें सहकार्यहि घेण्यांत येणार आहे. खनिज संपत्तीचा विकास करणाऱ्या कंपन्या, औद्योगिक कारखाने आणि व्यापारी संस्था ह्यांना भांडवलाचा पुरवठा करण्याचा कॉर्पोरेशनचा विचार आहे. कॉर्पोरेशनच्या एकूण भांडवलापैकीं तीन पंचमांश भांडवल अमेरिकेंतील आणि कॅनडांतील बँकांनीं पुरविलेलें आहे. असें असलें तरी, भांडवलाची गुंतवणूक करतांना मुख्यतः युरोपांतील देश आणि कॉमनवेल्थ गटांतील देश ह्यांनाच प्राधान्य देण्यांत येणार आहे.

### विजेच्या भारी यंत्रांची निर्मिति

भारतीय सरकारनें विजेची भारी यंत्रसामुग्री निर्माण करण्याचा कारखाना काढण्याचें ठरविलें असून ह्या कामीं ब्रिटनच्या असोसिएटेड इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज ह्या गटाशीं वाटाघाटी करण्याचा निर्णय घेतला आहे. हा कारखाना उभारल्यामुळें देशांतील धरणांसाठी लागणारीं यंत्रें आणि रेल्वेला लागणारीं यंत्रें ह्यांची गरज बऱ्याचशा प्रमाणांत देशांतच भागवितां येऊं लागेल. कारखाना उभारण्यासाठी २५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. तो बांधून पूर्ण व्हावयास ४ वर्षांचाच अवधी लागणार असला, तरी असोसिएटेड इंडस्ट्रीजशीं करण्यांत यावयाचा करार मात्र १५ वर्षे मुदतीचा राहील. पुढें-मागें कारखान्याचा विस्तार करावयाच्या वेळीं सल्लामसलत घेतां यावी, म्हणून दीर्घ मुदतीचा करार करण्यांत येणार आहे. हा उद्योगधंदा मूलभूत स्वरूपाचा असल्यामुळें चालू पंचवार्षिक कार्यक्रमांतच त्याचा समावेश नियोजन समितीनें केला होता. आणि त्यासाठी ७ कोटी रुपयांची तरतूदहि केली होती. असोसिएटेड इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज व जर्मनीची सीमेन्स कंपनी अशा दोन कारखान्यांकडून ह्यासंबंधीचे अहवाल मागविण्यांत आले होते. दोन्ही कारखान्यांचे अहवाल नुकतेच सरकारला सादर करण्यांत आले होते. दोन्ही अहवालांवर विचारविनिमय करण्यांत आल्यावर ब्रिटिश कारखान्याकडून तपशीलवार योजना मागविण्यांत यावी, असें ठरविण्यांत आलें. ब्रिटिश तज्ज्ञांचें एक मंडळ सध्यां दिल्लींत असून त्याच्याशीं भारतीय सरकारच्या वाटाघाटी चालू आहेत. कारखान्याची जागा व इतर तपशील अजून ठरावयाचा आहे.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

पोस्ट बॉक्स नं. ५११ टेलिफोन नं. २४८२

पुणें जिल्ह्यांतील सर्व जनतेच्या विश्वासास पात्र झालेली ही सहकारी मध्यवर्ती बँक असून गेलीं आठ वर्षें आपले भागीदारांस ६ टक्के डिव्हिडंड देत आहे. भाग विक्री चालू आहे. बँकेचे मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट व्हॉल्ट व सेफ कस्टडीची सोय आहे. पुणें शहरांत सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय प्रथमतः आपल्या बँकेनेंच सुरूं केली. जिल्ह्यांत सर्व तालुक्याचे ठिकाणीं बँकेच्या शाखा असून त्यांचे मार्फत बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. बँकेची सर्वांगीण प्रगति खालील आंकड्यांवरून दिसून येईल.

| | | |
|---|---|---|
| (१) दिनांक ३०-६-५५ अखेर भागांचें वसूल भांडवल | रु. | ८,३२,००० |
| (२) गंगाजळी व इतर फंडस् | रु. | ७,९६,००० |
| (३) एकूण ठेवी | रु. | १,६७,००,०००चे वर |
| (४) एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९१,२७,०००चे वर |

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फें | रु. | ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फें | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

—यथावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले कोल्हापूर व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.



स्थापना सन १९३५ टे. न. २४५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. | १,००,००० |
| जमा भांडवल | रु. | ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. | ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. | ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. | ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. ढोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे,
श्री. म. वा. बेंडे, श्री. झा. मा. मनसूख.
डायरेक्टर्स.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व
श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.